

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४५२

# इत्थंभूत

चंद्रकान्त पाटील

REFBK-0023539
REFBK-0023539

# इत्थंभूत

चंद्रकांत पाटील

REFBK-0023539
REFBK-0023539

पॉप्युलर प्रकाशन

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

**सूचना :**—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्र. मा. प. )
५०००-४-८०

सं. काव्य
2752
23439
24/4/82

# इत्थंभूत

चंद्रकांत पाटील

REFBK-0023539
REFBK-0023539

पॉप्युलर प्रकाशन

इत्थंभूत
पॉप्युलर प्रकाशन
(म-४७५)

Itthambhoot
(Marathi Poems)
Chandrakant Patil

© चंद्रकांत पाटील

पहिली आवृत्ती
१९८२/१९०३

मुद्रक
अरुण नाईक
अक्षर प्रतिरूप
४२, आंबेकर मार्ग
वडाळा, मुंबई ४०० ०३१

छायामुद्रण
निनाद माटे
अक्षरछाया
२०३५, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

प्रकाशक
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, ताडदेव रोड
मुंबई ४०० ०३४

''आर्ट, ऑल आर्ट, इज् अ हाय्ली रिस्पेक्टबल् मॅटर,
बट् इट् इज् सुपरफीशल् अँड फ्रिव्हलस् इफ् इट् इज्
कम्पेअर्ड विथ् द टेरिबल् सीरिअस्नेस् ऑफ् लाइफ्.''

– ओसे ओर्तेगा ई गासेत.

**पहिली कविता**
ॲपथी
१९७१

**दुसरी कविता**
ॲंटिपथी
१९७३

**तिसरी कविता**
सिम्पथी
१९७६

**चौथी कविता**
रोझीवरील निबंधाची
प्रस्तावना
१९७६

**पाचवी कविता**
इत्थंभूत
१९७८

**सहावी कविता**
निवांत
१९८०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

**पहिली कविता**
**ॲपथी**
**१९७१**

१.
पांढऱ्या कागदावर सही एक घडी पाच चित्रं
माझी आई भलत्या ठिकाणी शिक्का मारून
आपला अधिकार वाया घालवून
आलीय् आत्ताच
दुपारी अकरा वाजता
पोलिंग बूथवर शुकशुकाट
२.
रंगित टोप्या छातीवर बिल्ले
मिसरूड न फुटलेली पोरं नंबरांच्या चिठ्ठ्या
काढून देतायत भलत्याच उत्साहात बाहेर
शंभर यार्डांबाहेर जवळपास
या मताचं म्हणणं काही नाहीय्
कुणासाठीच

३.

व्यूअरोक्रॅटिक घडयाळातल्या
सेकंदाच्या काटयावर लटकून
कारकुनांच्या टोळया
डाव्या हाताच्या एका बोटावर काळी निशाणी
काळी शाई स्पिरिट मिथायलेटिड डीनेचर्ड
माणूस मत खाजदार आंबदार काम दार
ओव्हर

४

दररोजच्या
खाजगीदार सार्वजनिक सारवत्रिक गप्पा
इंदिरा गांधींचं भविष्य
माणूस-सोबत-तरुणभारत-नवशक्ती-ब्लिट्झ-टाइम्स
इंडिकेट
सिंडिकेट
शिवसेना
जनसंघ
एस्एस्पी
पीएस्पी
मार्क्सिस्ट
सीपीआय्
फॉर ब्लॉक
डीएम्के
क्रान्तिदल
दलदल चिखल गटारी भुयारी तयारी योजना
शहरात पन्नास ते पंचेचाळीस टक्के
खेडयात पासष्ट
लॉजवर गुलाबजाम
भजी, नायलॉन वॉटर, ताक
माइक्चे घसे बसले बों-ब-लू-न
बोम्बोम्बोम्बोम्बोम्बोम्बोम्बोम्बोम्बोम्बोम्ब् बोम्ब

५.
भितीभितींवर
बुद्धिवाद्यांचे शिमगे
हिजडयांच्या रंगीबेरंगी कपडयांसारखे
जाहिरनामे
जाहीरमाने
कावळे पिंडीला शिवांशिवंतायत्

६.
तुमच्या
गोंडस बोटांच्या गुलाबांवरून
सत्ता
आल्लाद् पा व लं उ च ली त
सत्ता
प्यादं बदलतेय्
इतिहासाला गती देतेय्
राष्ट्राच्या सगळया अवयवांत
वादळं
उठतायत् तरी–

७.
–कॉलनीत पहाट
रेडियोत भज्नं
सारस्वतांची गोड गोड भावगीतं
बिनाका टूथपेस्ट
लिप्टन चहा ब्रू कॉफी पोरीची शू–
वर्तमानपत्रावर
दैनंदिन वर्तमान
समाजवादी समाजरचना
पंचवीस पक्षातरं/चार खून/तीन दंगली/सतरा जखमी/दोन ठार
घडामोडी
डीएचा तुकडा वाढवून
जाहिराती नाटकांच्या/शिणमाच्या/काडीमोडीच्या

८.
घरी
धुऊन इस्त्रीचे कपडे नंतर
आधी जेवण
रॅशनचे गहू रॅशनचे तांदूळ
भाजी/चटणी/ताक/लोणचं
पंधरा पैसे दहा-वीसची बस किडकी सुपारी
टाऽ टाऽ होऽ ऽ
बायको पोरगी गॅलरी
धुणं वाळवायची काठी साडी अंडरवेअर
बनियन
रात्रीच्या पापी नाइटपँटची तारेवर आत्महत्या
उलटं टांगून घेऊन
९.
गठ्ठे कामचुकार कागदांनी भरून
पट्टे बाबूराव
टाइप्रायटरचं कल्याणजी-आनंदजी
वैतागाच्या कॅन्व्हसवर
पोरींचं चीपर सेक्सअपील
—हिजडे हीरो ढेपीसारख्या हिरॉयनी
पीक आवर्स
वर्दळीसारखं संगीत
बेसुमार
बाहेर—
खिडकीबाहेर दाराबाहेर
रस्ताभरचौकभरशहरभरआभाळभर
किशोरकुमारचा चाराणेवाला आवाज
यंग्रस्तुमानकोंक्रस्तू डिंग्रस्तुमानकुडिकुस्तू
आठवणींच्या गटारातून
तुडुंब रोमान्स वाहून—
लंच
अर्ध्या पोळीत थोबाडं
टंच

१०.
बोअरडम्–
दरम्यान
बोअरडम्

संध्याकाळ

११.
मार्च एक
पहिली तारीख
घरमालक ऐंशी
किराणा एकशेवीस
कपडेवाला पन्नास
दूध एकवीसपंच्यात्तर
रोजचा भाजीपाला पंधरासोळा
डॉक्टर चाळीस
भीशी वीसआपण वीसबायको
हातउसने चाळीस
वर्तमानपत्र पाच अंदाजे
वरतून वीसेक असल्यासनसल्यास आल्यागेल्यास
पीएफ् नाही विम्याचे हफ्ते नाहीत
वीसनंतर ठणठण
रिकाम्या खिश्यात फिनान्शियल एक्स्प्रेस

एक जिवलग प्रेमाचं मनिप्लँट
आपल्यासाठी
दोस्तांच्या खिश्यात
संकोचत वाढणारं
वाढवलेलं

पैशे पायजेयत्
रिक्षा/दूध/औषधे/एखादी साडी/शिण्मा
स्टॉलवर नवीन पुस्तकं

पैशे पायजेयत्
काळचा जंगलातल्या झाडाना लगडलेले
ओपन : ० क्लोज : ० ब्रॅकेट :०० पैशे—
पायजेयत् फ्लॅश शो टेबल रमी
झिअरो मार्क्स झिअरो कॅपिटल
दास दासानुदास
पैशे पायजेयत्

१२.
भाजीच्या पिशवीतून संध्याकाळ
गॅलरी
बिनओझ्याचं डोकं
रोमान्स सस्पेन्स पेशन्स इम्पेशन्स ऑनेस्टी कल्चर—
—बायको
कडेवर पोरगी
लटका राग लडिवाळ अंगाला अंग—
दरवाजा बंद।

संध्याकाळचं फिरणं
जमल्यास मॅचिंग जमल्यास आय्-कॅचिंग
कपडे
पुन्हा घर
जमल्यास वेणी भाजीपाल्यासोबत
पुन्हा घर
भळाभळा रेडिओ
आपली आवड सिलोन
पुन्हा घर
भाकरी चेंज थालिपीठ ताक चेंज कोशिम्बीर
स्वस्थ खुर्चीवर
पान चघळीत गेलेला दिवस चघळीत
सुगंधी तंबाखू
अप्सरा/मेनका/मनोहर/फिल्मफेअर
सत्यकथा/सतीचं वाण/घरगंगेच्या काठी

लायब्रीतलं लाइफ लायब्रीतलं लायबीतलं
लंडन मॅगेझीनं पार्टिझन रिव्ह्यू एव्हर—
ग्रीन रिव्ह्यू महाराष्ट्र टाइम्स—

१३.
रात्र कच्च्या वेळची
दरम्यानची
रिकामी निवान्त
एकाला दोस्तोव्स्की डीटेलात निवान्त
एकाला एरिक अॅम्बलर जेम्स हॅडली एकाला
पोर्टनॉइज् कंप्लेंट व्हॉयूर नेकिड् लंच मायुरा ब्रॅकिन्‌रिज्
एकाला सी डे लेविस एफ् आर लेविस् लेवी-स्ट्राउस्

आपल्यासाठी :
उजळणीचं पुस्तक
मस्तक उशी सामसूम

१४.
सामसूम
बेडलॅम्प असल्यास
नसल्यास काळोख
दररोजचे डावपेच दररोजचे चीत्कार
दररोजच्या मामुली काळज्यांची लक्तरं
हँगरवर लटकून इलेक्शन्स
पवित्र अधिकार इत्यादी इत्यादी
लाल त्रिकोणाच्या पिशवीत
मांडवावरची वेल
पर्मेश्वरी देणग्यांसगट
सगळं—

१५.
—ऑलवेल
सगळं सामसूम
सगळं इन्‌व्हॅलिड

दीड लाख इन्व्हॅलिड  मतांइतकं सगळं :
: सामसूम
हे सगळं बदलायला पायजेय्, सरकारसुद्धा–
एवढी ओरिजिनॅलिटी
एवढं कॉन्ट्रिब्यूशन
रिव्होल्टचं रॉ मटीरिअल
ओर्तेगा चे उशीवर डोकं
ॲपथी
– माझ्या अशिक्षित आईचा आय्क्यू माझ्याहून जास्त!

□ □ □

**दुसरी कविता**
**अँटिपथी**
**१९७३**

१.
बाहात्तराच्या मुड्यावर घोंगडीएवढं कफन पांघरून
पुढं चालू
वजाबाकीचा हिशेब
जमेच्या बाजूस पकडताना
कालस्त्रोतात
निसटून घसरलेली
हाडामांसांची अस्तित्त्वं–

२.
–एझ्रा पाउंड नावाचा
वेलक्षण हायपरबॉलिक कर्व्ह
स्फटिकासारखा सलत राहणारा
गीता दत्तचा आवाज
मोलॅसिसच्या तळाशी विरघळून

मीनाकुमारीची पार्थिवता
वर वर कापत येणारे
नुस्ते थरथरशब्द
नुस्ते नोस्टॅल्जिक चेहरे
प्रश्नचिन्हांचे गळफास लावून घेऊन
पूर्णविरामात एक संवेदी शरीर
एक
नास्तित्व—

३.
घरातल्या
भिंती कोलमडून पडतात
निवान्त रात्रीवर
काळ्या तबकडीवरून
तरंगत तरंगत सांडून जाते
आध्यात्मिक भाववशता:
डेथ् शॅल हॅव् नो डमीनिअन्, डेथ शॅल् हॅव्...

४.
मज्जातंतूंच्या फांद्यांची विलोभस झाडं
वाटा चुकवतात
थडथडत येऊन अचानक्
उभं राहतं समोर
मध्यवर्गीय संवेदन
भीती, सहानुभूती, उसनी विकलता
विसरलेपणा, दैनंदिन चक्राचे बोथट दात
कुणीच कुणाकडं पाहत नाही आयुष्यभर
डोळ्यांच्या गुहा उघडून

५.
उठून झोपण्यापर्यंतचं
एक स्वयम्भू आयुष्य
फ्लशच्या पाण्यासोबत
सोईस्कर सोडून दिलेल्या

अडचणीच्या भावना
मानवी
मध्ययुगीन आणाभाका
समजूतदारपणाचे सार्वजनिक गोडवे
लकी जिम् विथ थर्टी थाउजंड् व्हिम्स
फक्त फक्त
यांत्रिक संभोगात निरोधचं संप्रेषण
बाकीचं शान्तिनिकेतन
इंडस्ट्रियल सिव्हिलिझेशन्

६.
नवरे
पौरुषत्व रुजवतात
बायका प्रेशर कुकरमधे दररोजच्या दररोज
आत्महत्या शिजवतात
लेकरं केसांना तेलापाण्यात रुजवतात
सासवा
सुनांना शिव्यांनी सजवतात
सगळ्यांना
अवघड जागी जखमा जखडून टाकतात
मध्यवर्गीय महालाबाहेर
नुस्ते बकालीचे ब्यूगल्स
ऐकू येतात घनःश्यामसुंदर
सकाळसंध्याकाळी
सगळ्या—

७.
सार्वजनिक ठिकाणांतून
मढ्यांच्या रांगा
अनगिनत रांगा
हालतात झुलत राहतात
कुणीच स्वतावर चिडून उठत नाही
एक गूढ शक्ती सर्वक्रियानियंत्रक

सगळ्या पोकळ मढ्यांतून
भरते खच्चून मध्यवर्गीय संवेदन
किंवा कशातनंतरी उरलेला भुस्सा
आणि—

८.
तमाम
पेशींमधे
जिवंतपणाची शिल्लक
बाहात्तराचं जीवाश्म
दैनंदिनीतल्या पानांत
वर्षातल्या नोंदींचं बाष्पीभवन होऊन
जातं उडून
बाहात्तरात काहीच काहीच घडत नाही

९.
घडत नाही
काहीच
काहीच बाहात्तरात
वजन कमी होत नाही
रॅशनवरची साखर संपून जात नाही
वीजकपातीची नोटीस येत नाही
मॅलन्यूट्रीशन होत नाही
बायकांचं उमळून पडत नाही
नव्या बाळांचे जन्म होत नाहीत
पैश्यांचे झरे आटत नाहीत
कर्जाचे पृष्ठवंश सरपटत नाहीत
याचना होत नाहीत
यातना होत नाहीत
अर्थव्यवस्थेचे आलेख
खालीखाली जात नाहीत
व्यासपीठं सजत नाहीत
आवाज बुलन्द होत नाहीत

सभा होत नाहीत
सिम्पोझिया होत नाहीत
पाऊस चुकत नाही
अवर्षणं येत नाहीत
माणसांची सरणं धुमसत नाहीत
जनावरांची समर्पणं होत नाहीत
घरं ओस पडत नाहीत
पोरं रस्त्यावर येत नाहीत
दुतर्फा फोडलेल्या खडीची झाडं
आयुष्यं शोषीत नाहीत निपचित
अश्मीभूत बाहात्तरात
कसलेच ओरखाडे उठत नाहीत

१०.
सोनसळी सांज
दांभिक प्याल्यातून हिरमिसळती बिअर
कॉन्टिनेंटल कॉन्शसनेस्
दांभिक छतातून घरंगळत
ओघळणारं
पाकिझाचं संगीत
नझाकत/हलचल/नालएदिल/नर्गिसचं फूल
होमोसेक्शुअल टेबल

११.
दांभिक
गॉगलमधून आनंदबनातील हिरवळ लसलशीत
क्वचित उशीवरली ओल अमंगळ
क्वचित हॉंगकॉंग फ्लूचे विषाणू
घशाला कोरड
क्वचित् एखादा खून
क्वचित् करप्शन
क्वचित हार्टअटॅक अगदी सुखासुखी
वाकीचं आनंदवन

बाकीचं शान्तिनिकेतन
बाकीचं सगळं नेहमीसारखं ए वन्
नेहमीसारखं—

१२.
हवेवर फसफसून येणारं
एक मध्यभ्रू प्रीतिगीत
एक मिश्रण काटेकोर मापांचं
छटाक चांदणं छटाक सावल्या
अर्धा लिटर पाऊस पाव लिटर आसवं
प्रत्येकी पाव किलो हुरहूर काहूर
वाट पाहणारी झिपरटणटणी
वाट हरवलेला रोम्यांटिक प्रियकर
अर्धा किलो असहाय्यता
दीड किलो अंधार

पावलापावलागणिक
वर्तमानपत्रातले सरळसोट कॉलम्स
वैचारिक आवर्तनं
बुद्धिवाद्यांची रणं
पगारांची कुंपणं
झिजलेली टायरं/ब्रेकडाउन/सायकलींवरची
गतिमान आयुष्यं
जिवंत हालचाली
जिवंत—

१३.
— सत्याचे मार्ग
आत्मचिंतनातून परमतत्त्वप्रकाश
मुक्ती मोक्ष
मास्टर मेकबिलीव्ह
यातनांचं आभाळ निखळताना
पाय सोडून पळणारं
पायाखालचं ग्राउंड

कोण गीता दत्त
कोण एझ्रा पाउंड

१४.

मी
स्वताला आत ओढून घेतो
स्वतातल्या वैश्विक पोकळीत
एक लांबलचक निरर्थ रिकामेपण
स्वतःचं स्वतापण शोधीत निव्वळ
आणि
अंगावर फुटून उठते मधूनच
बाहात्तरची ॲलर्जी

१५.
दांभिक बुरख्यांच्या जंगलात
अस्ताव्यस्त
सगळे सडून जातात अवयव माझे
मेंदूवर सर्वसंगानुरूप आध्यात्मिक बुरशी
आणि
माझ्याच मुडद्यावर
घोंगडीएवढं कफन पांघरून
बाहात्तर निघून जातं पुढं त्र्याहात्तरची घंटा हालवीत
-- आमेन! आमेन!

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

**तिसरी कविता**
**सिम्पथी**
**१९७६**

१.
एका गूढ ऋचेतील
दाही दिशांना व्यापून उरणारी
अकरावी मनोदिशा
छिन्नभिन्न होतेय् तो क्षण
रुतून बसलाय् गरगरत
गर्गरत–

२.
येणाऱ्या
स्वप्नांनी ओरबाडून टाकलेल्या
वास्तवाची
फाटकी लक्तरं गुंडाळून
अंगाभोवती

सर्वभूत

सातत्याच्या
चिंधड्या विखुरलेल्या
अस्ताव्यस्त

इच्छा-अनिच्छेच्या
धूमिल सीमारेषेवर
अचानक कोसळलेलं शरीर

नियंत्रिताला
अनियंत्रतेनं
दिलेले बेसावध छेद
आणि
मेंदूत
उफाळून आलेलं चक्रीवादळ

३.
पापण्यांचे
विक्राळ लोखंडी दरवाजे
उघडत नाहीयत्
थांबत नाहीये
बोटांचा थरकाप
मंद हालचाली होतायत् हातांच्या
चंद्रपाषाणावर उतरून
अलवार चालत जाणाऱ्या
मानवासारख्या
संघर्ष
सघनतेचा गुरुत्वाकर्षाशी

४.
संघर्ष
अध्याहृत आत्म्याचा
अनादि अनंत
अव्यक्त अविनाशी
आणि अस्तित्त्व :
विस्फोटित मज्जापेशी

छिन्नमानसाच्या
अन्तर्गोलातून आरपार होताना
विस्कळित होऊन
वाऱ्यानं बहकणारं
संथ खाली येऊन
मरणाच्या तळाशी
बसणारं आयुष्य
छिन्नभिन्न –

५.

– भविष्य
ही पुसलेल्या चेहऱ्यांची
जिवंत हालती-बोलती माणसं
यांचं
नातं सांगणाऱ्या
रक्ताचं बर्फ झालं शरीरभर
आणि
तरंगलं पाण्यावर डोळ्यांतल्या

– त्याच्या
यातना
कळत नाहीयत् कुणालाच
कुणालाच दिसत नाहीय्
काळजातला कल्लोळ
भाजत नाहीय् कुणीच
खोल आतल्या वणव्यानं

डोळ्यांच्या टपोऱ्या गेंदातून
उडालेली फुलपाखरं
हरवली आभाळाच्या
विराट पोकळीत
आणि वितळल्या तमाम खाणाखुणा
ओळखीच्या
नेहमीच्या

६.
अंधारात
बुडून मेलेलं मन
फुगून आलं अचानक
आणि लागलं तरंगायला
अंधारावर

हा अंधार एकंकार नाहीये
नाहीये तलम विरविरीत
जाळीदार नाहीये
नाहीये मुलायम मोरपिसा अंधार
डोळचांत बुडून जाणारं अवकाश नाहीये
नाहीये काजळात भिनलेला अंधार
जाणिवेच्या
सीमांतापर्यंत पसरलेलं
अंधाराचं अजस्त्र वाळवंट
रुतलेलं
फैलावलेलं गात्रांत
सताड उघडचा डोळचांत
वादळी मेंदूत—

७.
ओठांतून
कोसळत येणारे स्वनातीत शब्द
गावत नाहीयत् कुणालाच
कुणाच्याच मुठीत मावत नाहीय्
सान्तातून
तुटून येणारं शोकाकुल पाखरू
कोण?
कशासाठी?
प्रचंड उत्पात
चंद्रावर मरून पडलेल्या
अचेतन सशासाठी

८.
सुजाण
गवतावर तुटून आलेली
प्रचंड शिळा
आणि
छातीत कोंडलेल्या
महासमुद्राच्या
अनिर्बंध धडका
मोझेइक् मनाचा
आवेग अनावर

९.
काटयांचे असंख्य खुरटे हात उभारून
पाणी मागणारा निवडुंग
नास्तित्त्वाचे बहुरंग
भ्रमाशी संग
आणि
मृगजळावर उठणारे
विस्कळित तरंग
काय होतय्?
नशेत संवेदन विघटित का होतय्?

गरगरत फिरणारी
काळाची विशाल बांगडी
निखळून तुटून गेली अचानक्
आणि
कचकडयांचा झाला
प्रचंड क्लाइडोस्कोप
कोण फिरवतय्?

१०.
अफीमी नशेच्या पाणबुडीतून प्रवास
मानससमुद्राच्या नितळखोल पाण्यात
स्वप्नांचे शंख, भासांचे शिपले, भ्रमाचे शैवल

चोरल वासनांचे थरथरते कोरल
नक्षत्रमाश्यांचे थवेच्या थवे
उसळून येणारे गतिमान् रंग
भीतीनं घेतलेलं उसनवार
खडकाआड दडून बसलेल्या
ऑक्टोपसचं अंग
— समुद्र अनंग!

११.
एकेक मनुष्य
इंद्रियधनुष्य
हद्दपार केलेल्या वासनेचं
अश्मीभूत आयुष्य
आणि आत आंतल्या गाभाऱ्यात
जपून ठेवलेला
न्यूनब्रम्हांडाचा अक्षय अभयगंड

१२.
कुणी अडकवलय्
या मृत्युगोलात
कुणी बसवलय् या वाहनावर
कोण चालवतय्
यातनांच्या पट्ट्यांवरून
आणि पट्ट्यापट्ट्यांमधलं
अपुरं अंतर
आयुष्य तोलून धरणारं
दूरवरून बघणारे परात्म प्रेक्षक
टाळ्यांचा कडकडाट
अंगावरून घसरत जाणारा

१३.
आठवणींनी डंख मारला त्या जागेवर
उगवला
विसरणीचा पहाड

८.
सुजाण
गवतावर तुटून आलेली
प्रचंड शिळा
आणि
छातीत कोंडलेल्या
महासमुद्राच्या
अनिर्बंध धडका
मोझेइक् मनाचा
आवेग अनावर

९.
काटयांचे असंख्य खुरटे हात उभारून
पाणी मागणारा निवडुंग
नास्तितत्त्वाचे बहुरंग
भ्रमाशी संग
आणि
मृगजळावर उठणारे
विस्कळित तरंग
काय होतय्?
नशेत संवेदन विघटित का होतय्?

गरगरत फिरणारी
काळाची विशाल बांगडी
निखळून तुटून गेली अचानक्
आणि
कचकडयांचा झाला
प्रचंड क्लाइडोस्कोप
कोण फिरवतय्?

१०.
अफीमी नशेच्या पाणबुडीतून प्रवास
मानससमुद्राच्या नितळखोल पाण्यात
स्वप्नांचे शंख, भासांचे शिंपले, भ्रमाचे शैवल

चोरल वासनांचे थरथरते कोरल
नक्षत्रमाश्यांचे थवेच्या थवे
उसळून येणारे गतिमान् रंग
भीतीनं घेतलेलं उसनवार
खडकाआड दडून बसलेल्या
ऑक्टोपसचं अंग
— समुद्र अनंग!

११.
एकेक मनुष्य
इंद्रियधनुष्य
हद्दपार केलेल्या वासनेचं
अश्मीभूत आयुष्य
आणि आत आंतल्या गाभाऱ्यात
जपून ठेवलेला
न्यूनब्रम्हांडाचा अक्षय अभयगंड

१२.
कुणी अडकवलय्
या मृत्युगोलात
कुणी बसवलय् या वाहनावर
कोण चालवतय्
यातनांच्या पट्ट्यांवरून
आणि पट्ट्यापट्ट्यांमधलं
अपुरं अंतर
आयुष्य तोलून धरणारं
दूरवरून बघणारे परात्म प्रेक्षक
टाळ्यांचा कडकडाट
अंगावरून घसरत जाणारा

१३.
आठवणींनी डंख मारला त्या जागेवर
उगवला
विसरणीचा पहाड

त्याच्या निबिड दऱ्याखोऱ्यांत
माजलेली असम्बद्ध जंगलं
सगळ्या बाजूंनी वेढून टाकणारी
प्रत्येक निसरड्या वाटेवर
क्रूर चकवे
शरीर : थकव्याचं संमोही फूल

१४
या
विलक्षण रित्या अम्बरात
लटकणारं
प्रक्षिप्त प्रश्नचिन्ह
अस्तित्त्वाचं झुंबर
काळंकभिन्न
ढगांनी छिन्नमानस केलेलं
का?
कशासाठी?

१५.
सुषुप्तीच्या
सीमाधूसर संधिरेषेवर
सूर्याचं
पूर्णबिम्ब उसळून येताना
प्राणात प्रध्वनित
ओळींच्या ओळी :

आयुष्य हलकल्लोळ
आनंद-यातनांचा जाळ
येके नास्तित्त्वाची वोळ
निस्संदर्भचि आथि ।।

आयुष्य व्यामोहछाया
कालस्त्रोतामधली मृगया
येके नास्तित्त्वाची किमया
निस्संदर्भचि आथि ।।

□ □ □

**चौथी कविता**
**रोझीवरील निबंधाची प्रस्तावना**
**१९७६**

एका अजस्त्र वस्तुभांडारातल्या
कॅश-काउंटरच्या काचेरी गुहेत
मी पाहूचलं तिला पहिल्यांदा
स्वप्नांच्या चांदव्याखाली बसून
रवंथ करीत होती ती आरामात

'एक्स्क्यूज मी'नं तंद्री तुटल्यावर
तिनं डोकावलं गुहेच्या गर्गरित डोळयांतून
शिकवून तयार केलेल्या ओठांचे
कोपरे दुमडले
हसण्याला गिलावा दिला
निरागसपणाचा
आणि टपोर डोळयांतला अवखळपणा
काचेवर कलंडवून म्हणाली ती :

जस्ट अ मिनट् प्लीज, 'शी वुड् बी कमिंग्...
इत्यादी.

मग गुहेची शिळा सरकवून
ती बाहेर आल्यावर
मी पाह्यलं तिचं सबंध कबंध
स्थूलतेकडं सरकत जाणारा
एक श्यामल ढग
बंदिस्त झालेला
धूसर निळ्या जॉर्जेटात
आणि गुहेच्या पारदर्शी भिंतींना
चिरून जाणाऱ्या नजरा
परावर्तित करण्यासाठी
गळ्याभोवती लावलेली घट्ट काळी पोत

मग माझं फिल्मी पोस्टर करून
टांगून ठेवलं तिनं गुहेसमोर
आणि
धावत गेली ती डाव्या जिन्याकडं
'शी वुड् बी'च्या शोधात
म्हणजे व्हीनिलचा प्रचंड बॉलच
थुई थुई करीत
गडगडत गेला पायऱ्यांवरून तळाशी

मी हातांची घडी सांभाळून
पाह्यला शेजारचा कपड्यांचा स्टॉल
आणि दोरीवर टांगलेल्या तमाम तयार कपड्यांत
बसवून पाह्यली ओळखीची शरीरं
आणि दूरवरच्या स्टॉलवरील
सगळी सौंदर्यप्रसाधनं
फासली त्यांच्या चेहऱ्यांवर जाहिरातींसारखी

मग मनाच्या अक्षावर
पाह्यल्या वाजवून
मागच्या स्टॉलवरील लाँग-प्ले तबकड्या

तर पुन्हापुन्हा घुमत ऱ्हायली
अख्तरीबाईच्या गळ्यात मोमिनची व्याकुळता

मग हातांना प्रचंड लाम्बवून
घुसवलं रेडिओच्या शो-केसमधे
आणि फिलेटिनाची जीभ ठेवली फिरवून
अल्गद कराचीवर
तर नेमकाच नूरजहाँचा आवाज
रुतून बसलेला अझमतच्या ओळींत

-आणि अचानक् घुसाय लागले छातीत
नोस्टॅल्जियाचे विषाणू
म्हणून
वास्तवाच्या दोन गोळ्या
टाकल्या पट्कन् गिळून
आणि परतलो पोस्टरच्या देहात
तर एका अदृश्य शक्तीनं
पायऱ्यांवरून उचलत आणलेला
प्रचंड पोलादी गोळा
एकदम समोर उजव्या जिन्यातून
पाल्यला निरखून
तर चक्क पोलादात रुतून बसलेले
मिस्किल डोळे
आणि मंद हालचाल शिकाऊ ओठांची :
ओऽ, शी इज् कमिंग...

मागाहून आलेल्या
'शी ईज' मधल्या शहामृगानं
आल्याआल्याच फटाकदिशी सांगून टाकलं
माझ्या कोडयाचं उत्तर :
सरऽ, माय् फ्रेंड मिस् रोझी...
इत्यादी.
तेव्हा सबंध वास्तुला व्यापून उरणाऱ्या
अदृश्य पारिजाताची फुलं

अंगभूत सवयीनं माना टाकीत होती
आणि त्रिमित रोझीला
चिकटलेलं जगण्याचं चौथं परिमाण
हरवून गेलं होतं काचेरी गुहेत.

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2552
ग्रं. क्र. 23539
काव्य 25/5/62
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

**पाचवी कविता**
**इत्थंभूत**
**१९७८**

१
संकोचून किंवा संपूर्ण व्याप्तीसह
काळोखाच्या गूढ निराकारात
अस्तित्व हरवून विरघळून जाताना
महानगरं नदी रस्ते घरं
आणि अदृश्य सृष्टिकोण
सर्वांवरून ओघळत तळाशी साचून
गात्रांत पसरताना
मेंदूतले असंख्य संदर्भहीन प्रस्फोट सांभाळत
स्थलकालाच्या अन्योन्यसंबंधांचं संतुलन जुळवत
रिकाम्या अवकाशाचं ओझं झेलीत मनावर
संवेदन उद्दीप्त करीत माफक मादकद्रव्यानं
एका धूसर सीमेवर उतरताना हलकेच
पस्तिसाव्या गूढतर गुहेचं उघडतं दार खडाक्कन

आणि प्रश्नांचे अधोमुख लवणस्तम्भ
लटकतात डोक्यावर :
कोऽ हम्?

२.

कोहम्‌च्या ध्वनिहीन किंकाळ्या उठतात
अधूनमधून गर्भाशयात
आणि आस्ते आस्ते जातात विरून
हृदयातल्या ठेक्यांच्या अव्याहत आदितालात
जशी शिवालयातल्या गाभाऱ्याची गर्भार शान्तता
टाकते गिळून
धुमसत जाणारा घंटानाद
शिवालयच होतं गर्भालय
खच्चून भरून अंतरंगात संपृक्त आदिकाळोख
आणि हृदयातला आदिताल
घालतो पांघरून आयुष्यभर
संरक्षणार्थ कवचकुंडल.

३.

गर्भाशयातल्या काळोखाला असते
वैश्विक निरामयता
भीतिमुक्त तिथल्या अवकाशाला
नसतं कुठलंच परिमाण
आणि कुठलाच संदर्भ नाळेशिवाय
असतो फक्त
कलेकलेनं वाढत जाणारा गर्भ
त्याच्या गर्भाशयी साम्राज्यात असतात पराभूत
सर्वसत्ताधीश जगन्नेते आणि जगन्नियंते
तिथल्या आदिकाळोखानं रचलेले व्यूह
भेदून जाता येत नाहीत
फ्रॉइड आणि मार्क्स आणि डार्विननं
प्रक्षेपित केलेल्या सर्वज्ञ त्रिकोणाला
गर्भाला असते अंगभूत नशा फक्त असण्याचीच

आणि वाढत जाण्याची
त्याच्या स्वयम्भू साम्राज्यात सत्त्वहीन होऊन जातं
धर्माचं अफीम इहवादाचं मारिहुवाना
सत्तेचा चरस यांतिकुळाचं मेस्कलीन
वैदिक वारसाचा सोमरस
सर्वमुक्तीचं एलुएसडी
किंवा सर्वसम्भवी शाम्भवी
गर्भाला असतं सम्मोहन निखालस निरागसतेचं.

४.
जन्मासोबतच ढासळून पडते भक्कम तटबंदी
ताडकन् तडकते सुरक्षित काच
पहिल्याच किरणात होतो साक्षात्कार
एका भयावह रौद्र जगाचा
आणि नाळेसोबतच तुटतो बन्द कमळाचा देठ
सगळी परिमाणं उलगडत जातात आस्ते आस्ते
अन्तर्भूत असणारी
सर्वसमावेशी जगण्याच्या परिमाणात
जन्म आणि जगण्यात असतं अन्तर फक्त
नाळेइतकंच किंवा
मैलन्मैल पसरत जाणाऱ्या नेणिवेइतकं
अग्निवलयातून उडी मारणारं सराइत कुत्रं
पडत नाही फुफाटचात
बसतं अडकून अग्निवलयातच
आणि प्रेक्षक वाजवतात टाळचा सोहळा करून
जन्मासोबतच बदलतात अस्तित्त्वाचे संदर्भ
उमलतात पहिल्याच ऋतूत संवेदनांची फुलं
ज्यांचे केसर असतात गळायचे मरणमयी काळोखात.

५.
कालस्त्रोतात
घसरून पडल्यावरचं अनिवार्य नामकरण
आणि त्याचे प्रतिध्वनी निरंतर आतल्याआत

आतल्याआत उसळते जिज्ञासा
कोसळतात प्रश्नांचे उत्तुंग कडे
निखळून पडतात मनात
अबोध आकार उद्दीप्त रंग निश्चळ घनता
खिळून जाते दृष्टी चंचल चांदव्यावर
किंवा आभाळात आयताकार खिडकीतल्या
आतल्याआत जाणवते रक्ताची ऊब
लागतो जाणवायला सवयीनं शिस्तबद्ध प्रवाह
सवयीनं जाणवतात उडणाऱ्या नसा
मेंदूतली सघनता स्नायूंची ताठरता पापण्यांचा आक्रोश
काटे हरवून बसलेलं हृदयातलं घड्याळ
सवयीनंच उमलतं आतल्याआत वेदनांचं असतेपण.

६.

आतल्याआत गरगरतात असंख्य चक्रीवादळं
आणि बाहेरच्या संघर्षात सुटायला येणारा तोल
खोल ज्याच्या श्वासात बंदिस्त दैनंदिन संस्कार
संस्कारांना असतात हिंस्त्र नखं श्वापदांसारखी
ओरखाडतात डोळे कान जीभ नाक आणि त्वचा
जखमा उभारतात खुणांचे दगड मनातल्या पाताळात
मधूनच फाटते क्वचित आतली भुई
येतो गदगदत लाव्हा उफाळून अचानक्
जखमांवर निखारे ठेवीत
पेरीत विद्रोहाची विलोभस अग्निबीजं
हिंस्त्र नखं खुडतात नवाळ कोमल पानं
ज्यांच्या धमन्यातनं वाहत जाणारी निरागसता सावकाश
त्यांच्या पाशात फसतात आपोआपच गळे
आणि संवेदनांनी बहरणारे मुक्तकाय मळे.

७.

फुटक्या भिंगातनं गाळून घेतलेली ओंजळीत
सूर्यकिरणांची ऊब लोलकातून पाह्यलेल्या
अख्ख्या जगाच्या सप्तरंगित कडा काजळी ल्यायलेल्या

तुकड्यातून सूर्यग्रहण डोळे फिरवणारा तांबारलेला तप्तगोल
क्षयी चंद्र क्षीण अस्थिपंजर चांदणं पळसपांगाऱ्यातून
संकासुरातून जास्वंदातून गुल्मोराच्या पंखातून
भडकतं ऊन थेंबांच्या चकमकत्या मासोळ्या
पारदर्शी पाण्यातलं घरंदाज शेवाळ
सराइत चिपरंग पाण्यावर उठणाऱ्या भाकरी
झाडांच्या उभारीतलं आव्हान वावदूक वारं
गवत सावध करणारं फुलपाखरांना अचानक
अंग तोलून हवेवर अधर स्थिरावलेली चिमणी
पिसांत घुसमटून दुपारचं भणंग एकटेपण

काळीज फाडणारी संध्याकाळची गोरखचिंच
भुताटक्या फांद्या
स्मशानातला चिरेबंद दगडी काळोख
ज्वाळांचा कल्लोळ
माळावरून माळवदावर भिरंगत येणारी
कोल्हेकुईची करुणाष्टकं
सटवी-टिटवीचं अभंग नातं घुबडांच्या ओव्या
स्वरहीन आरोळ्या
उसळत्या सावल्यांचे आकार-अनाकार
चेहरे बिनचेहरे

आणि मज्जेला उलटी लटकलेली असंख्य वटवाघुळं
कुठल्याही थांब्यावरून मागं नेणारी
त्यांच्या पंखांची फडफड
कुठल्याही बिंदूवर संपृक्त तडफड.

८.

पहिलाच अपघात कोरून ठेवलेला
मेंदूतल्या पडद्यावर पेशीपेशी झिनझिनत
थरारून गेलेल्या अकस्मात आघातानं
विद्युन्नसांवर कोसळता धबधबा
काळ गोठून गोळा झालेला संज्ञाहीन अंशावर
आयुष्य तोलून धरणाऱ्या मरणाच्या यमकानं

स्वच्छ स्फटिकांवर ओघळलेला रक्तरंग
पिसांचे तुरे चिकटून भीतीनं एकमेकास
डोळ्यांतल्या डोळ्यांत सावध झालेलं काटेरी सायाळ
पापण्या ताठरलेल्या पट्कन् हवेवर निवडुंगाच्या

मरण एकटयाचं एकेकाचं ढवळतं मुळापासून
ढकलतं अतींद्रियं वेदनेच्या महासमुद्रात
हेलावतो तळनुतळ मात्र सार्वत्रिक
हिंसाचारातील मरणाचं महासत्र
छेडत नाही कसलंच आंतरिक आंदोलन
उमलत नाही अंगभूत करुणा
लोकस्तरावर चालतं उग्र सौंदर्यपर्व

पहिल्या अपघातानंतर
आता कित्येक ऋतु उलटल्यावर उजळतो अन्वयार्थ
की प्रत्येक दंगल
विद्वेषानं जळणारं माणसांचं सार्वजनिक जंगल
विवेकाच्या समाधीवर वाळलेलं जातिधर्माचं फूल.

९.

अवकाश आणि इतिहासाच्या संदर्भांचं नातं
उलगडण्याआधीच
अंत:प्रक्षेपित झालेला एकेक तुकडा खोलवर :

सूर्य डोंगर नदी अंधार एकंकार ओंकार
मायावी माती पारदर्शी पाणी उन्हाचे आकार
निर्मनुष्य निसर्ग निरागस हिरवेपण निरामय संध्याकाळ
फुलांना झोंवणारं अनुत्कट वारं अनुत्कट आभाळ
आनंद आल्हाद उल्हास आभास औदासिन्य

गच्च रुतून बसलेल्या पहिल्यावहिल्या प्रतीकांवरुन
तरंगत तरंगत अलगद ओळींवर उतरलेली
सृजनाचे पंख लावून गूढातून आलेली
नवतीची पाखरं
त्यांच्या रक्ताचा गरम उबदार प्रवाह
आणि धडधडतं हृदय जाणवणारं शब्दाशब्दांतून

पहिल्याच सृजनानं सावरलेली काळाची पडझड
डोळ्यांत कोलमडून पडणाऱ्या
स्थितिस्थापक स्थळाची पडझड
पहिल्याच सृजनात स्थिरावलेला स्वयम्भू क्षण
मौनात मावळलेलं सम्प्रेषण
आणि
कळत-नकळत गळून पडलेलं सलणारं असतेपण.

१०.
सृजनाचे पहिलेवहिले दहावीस ढग बरसून गेल्यावर
स्वच्छ नितळ आभाळ स्वच्छ फटफटीत मन
आणि रोमांतिक पर्यावरणात
अनायास माजणारं कवितांचं तण
सवयीच्या वाटेवरील सवयीचे चकवे —
गढूळ प्रवाहात दमछाक घडवणारे गर्गर भोवरे

विरहातून आर्तता
उन्हाळ्यातल्या संध्याकाळी उबवलेली दु:खं
जख्मी चंद्रबिंबानं पेटून प्रेयसी
सावल्या लपेटून
वांझ संघटन आयातित अनुभूती अनाठायी अलंकरण
छद्‌म अस्तित्त्व
भळभळून येणारं आत्मरंजनी अहम्‌पण
ओळीमागून ओळी स्वच्छ कागदावर
स्वच्छ संरचन

—आणि अंगभूत लयीवर नाचवणारं आंतरिक द्वंद्व
व्यक्ती आणि समष्टी समूह आणि समाज खेडी—महानगरं
आर्थिक असंतुलन सामाजिक स्तरीकरण अर्थहीन अन्वेषण
वाळवंटासारखं लाम्बलचक आयुष्य असह्य एकाकीपण
परात्म आसमन्त परात्म मूल्यं परात्म प्रत्येक क्षण

कविताच आयुष्य कविता कबूलियत कविता प्रायश्चित्त
कविता हातातून निसटलेलं काचपात्र कविता शिनाख्त.

११.

स्वप्नवास्तव होतं छिन्नी   तिच्या आघातानं फुटतं
प्रस्थापित पाषाणाचं खडतर काळीज
फक्त पाषाणावरच तग धरून वाढणाऱ्या
आणि वाढत वाढत पाषाणभूत होणाऱ्या
सुरंगी सहजीवकांची शकलं विखुरतात सभोवार
सभोवार त्यांचे सौंदर्योत्सुक बीजाणू
भस्मसात होतात–
ती अग्निदाहकता विद्रोहाची असते
दृष्टिहीन करणारं धुकं रोमांतिक विरघळून जातं
दांभिक पिवळी पानं माळून
ताठा टिकवणारी महाकाय झाडं जातात वाळून

अयाचित आणि अपरिहार्य विद्रोहाच्या ज्वाळांनी
महानगराच्या आश्रयाला आलेले कित्येक महाकवी
पाषाण तडकायला आल्यावर
शोधू लागतात सांदीकपारी
कपारींचेच खंदक करून
अवचेतन भीतीनं बडवतात युद्धाचे नगारे
त्यांची गंजलेली शस्त्रं थरारतात किंचित आवाजानं
आणि पुन्हा निश्चल होतात
नवा गंज चढवून घेण्यासाठी

वर्तमानपत्रातल्या स्तंभास्तंभातून सुरुंग पेरुन
बिनधास्त झालेल्या सुरक्षापथकाला
उडवता येत नाही
निव्वळ दैनंदिनीतला दिनांकसुद्धा.

१२.

आद्यतन महाकवीच्या वंशवृक्षाला फुटलेल्या
आगंतुक मुळ्यांशी नातं सांगणारे महाकवी
उठतात आणि सुरू करतात दैनंदिन होमहवन
देशीपरदेशी नियतकालिकांची भूर्जपत्रं उघडतात
दबा धरून झडप घालतात शब्दांवर प्रतिमांवर

भावाकुल प्रतीकांवर   पाहिजे ते चाळून घेतात
फिरवाफिरवीचं सारवासारवीचं अर्घ्यदान करीत
जुळ्यातिळ्या कविता घालतात

महाकवी ओळखतात सांस्कृतिक जबाबदारी
तौलनिक साहित्याच्या उच्चासनावर आरूढ होऊन
घट्ट पकडून ठेवतात वैदिक पारंब्या लावतात
आध्यात्मिक पातळीला व्यक्तिगत किनार
वर सौंदर्याची सगुण फुलं रंगवतात
कर्मकांडाला
कांडीच्या कर्माचा अन्वय देतात
टेहळणीच्या उंच बुरुजावर बसून
अडवतात वाटा थोपवतात हल्ले आणि
प्रादेशिक बिल्ले लावून किल्ले लढवून दाखवतात

महाकवींचा परमेश्वर महाकवींना शान्ती देवो!
महाकवी मेल्यावर
त्यांच्या पिंडाला एखादा तरी समीक्षक शिवो!

१३.
– हे लक्ष्यात आल्यावर
या बाजारातल्या भ्रष्ट वाटांवरून
चालत जाण्याचं नाकारणारे
उधळून लावतात
साहित्यिक खोक्यात वाढत जाणारं परजीवी आयुष्य
पानांपानांतून साचत जाणारा दैनंदिन कचरा

उधळून लावतात
दांभिकांचे दयाघन मुखवटे
आणि त्यांच्या दुकानासमोर
रॉयल्टीचा पट्टा अडकवून बांधून ठेवलेले
पाळीव प्राणी
स्वतःभोवतीच गरगर फिरून
व्यापारी वाऱ्याची दिशा दाखवणारे
समीक्षक कोंबडे दारांवर टांगलेले

उधळून लावतात
शिकवलेले आवाज काढून दाखवणारे
यंत्रवत् राघू
उच्चभ्रू संसाराची गाणी गाणाऱ्या
गिर्रेबाज मैना
गुपचुप स्टुलावर बसून राहणारे साहित्यकेसरी
गुदगुल्या करून हसवत ठेवणारी विनोदी अस्वलं
प्रतिष्ठेसाठी तरसणारे तरस
सारस्वत सारस
रंग बदलणारे संतप्त विद्रोही सरडे

प्रतिष्ठेच्या झुल्यावरून घरंगळत
खाली कोसळताना
सगळ्याच दांभिकांना अभय देते
संस्कृतीची विशाल ताणलेली जाळी.

१४.

संस्कृती नावाची भयंकर विद्रूप स्त्री
अदृष्य भटकणारी महानगरातल्या रस्त्यांवरून
काळ्या पैश्याचा बुक्का कपाळावर
अंगभर पांघरलेली उन्मादक पोस्टरं
धमन्यांतून खळाळणारं परलोकसंगीत
चिअर्सचा मंत्रघोष
नवसाला जुगार
सुऱ्यांचं संरक्षण
खून अभिषेकाखातर

तिची झडलेली बोटं फिरतात लडिवाळपणानं
आर्ट गॅलऱ्यांत लटकावलेल्या अधोवास्तव प्रयोगांतून
रविशंकरच्या पश्चिमोत्सुक सतारीवरून
मुलायम पडद्यांवरून
गगनगामी इमारतीतून
पंचतारांकित स्वप्नवास्तवामधून

तिचा अनुनय करणाऱ्या
भ्रष्ट सामंती जेत्यांना
निःशेष करता येत नाही
झोपडपट्ट्यांतून
आणि सार्वजनिक वासनालयांतून
मुक्तपणे वाढत जाणारी तिची अनौरस संतान.

१५.
समूहावर साचलेल्या सांस्कृतिक मळीतून
डोकं वर काढून विद्रोह केल्यावर
मी फेकलंवतं किशोरावस्थेतच माझं ब्राम्हण्य
एका मंत्रित धाग्यासोबत गटारात आणि
निघालोव्तो
जातीजातींतील सामंजस्याच्या शोधात

एवढ्या वर्षांची भ्रमंती संपवून आल्यावर
आत्ता कळतंय की ते होतं फूल गुलबकावलीचं
एका सुदूर महालात सुरक्षित
आणि तिकडच्या सगळ्याच वाटा हरवून गेलेल्या
आणि फूलसुद्धा झालेलं कधीचंच अदृष्य

आत्ता कळतंय्
की जाती असतात सत्ताधारी मुकुटाचं
संरक्षण करणारे वेताळ ब्रम्हसमंध
शपथविधीनंतरच्या प्रदीर्घ कृष्णपक्षात
त्यांच्या लीलांनी हादरून जातात
गावागावांतल्या अश्वत्त्थांची पाळंमुळं फांद्याफांद्या
हादरते सबंध पायाखालची जमीन
बिबळ्यांच्या आरोळ्या घश्यांतच विरघळतात
वेताळांचे प्रदीर्घ हात डोळ्यांसमोर नाचू लागतात
तेव्हा असहाय्य होऊन सगेसोयरे साथी
वळतात आपोआपच मंत्रित धाग्याकडं
निरर्थ शोधू लागतात धाग्यावरील ब्रम्हगाठ.

१६.
मी जमवले विभिन्न स्तरातले बुद्धिवादी समवयस्क
जन्मजात जातींची वर्तुळं तोडून बाहेर आलेले
आम्ही हेरलं की श्वासासारखी सहज फुलणारी
भाषाच होऊन बसते जातीय ध्रुवीकरणाचं पहिलं शस्त्र
भ्रष्ट राजनीतीच्या चाकावर घासून धारदार झालेलं
आम्ही पाह्यलं जातीजातींच्या असंख्य गळवांमुळं
अवचेतन समाजाचं केविलवाणं विकलांग
सत्तेच्या धुमाळीत संरक्षणाखातर
जेत्यांनी चढवलेलं जातीय शिरस्त्राण
आणि संपत्तीचं अभेद्य चिलखत
नेत्यांनी उडवलेला
सामाजिक-राजकीय धुवांमधोमधचा
महाकाय पूल

आम्ही पाह्यलावता
विद्रोहाचे प्रखर पंजे उगारून
झडप घालणाऱ्या बिबळ्यांचा शक्तिशाली समूह
संसर्गासाठी समूहात सोडलेले लाल जीवाणू
आणि नंतरचं दुर्दैवी विघटन
त्याच्याही नंतरचं
आत्मघातकी पिसाटपण
इथल्याच वाळवंटाशी विद्रोह करणारं
लाल मृगजळ
दगडातच अन्तिम मूल्यं शोधणारं
शेंदरी मायाजाल
राजकीय प्रणाल्यांनी छिन्नमानस झालेले
असहाय्य बुद्धिमंत
मगळचाच दिशांनी अनुत्साही करणारं
प्रदूपित आसमंत.

१७.
उत्साहानं हुंदडत निघालेल्या चिमुकल्या मुलाचा

हात धरून शाळेत सोडताना
जगावं लागतं पुन्हा
दृष्टिआड झालेलं भीतिग्रस्त बालपण
आणि शाळेतल्या कोंडवाड्यातले असह्य आघात

एकतीस वर्षं उलटून गेल्यानंतरही
बदलत नाही काहीच
पुस्तकातल्या चित्रांशिवाय
स्वप्नं उध्वस्त करणाऱ्या भिंती जशातशाच
निरूपाय म्हणून नौकरी करणारे
मास्तर जसेतसेच
सामाजिक प्रतिष्ठेवर धंदा करणाऱ्या
संस्था जशातशाच
शाळा जशातशाच उजाड अरण्य होणाऱ्या
जिथं कापतात मुळापासून जिज्ञासा कुतूहलाच्या वेली
आणि कल्पनांची दीर्घपत्रित वनराजी
विचारांची भुइकमळं कोंभातच जळून जातात

भ्रष्टाचाराचा भुस्सा भरून ठेवलेल्या
तमाम सामाजिक शैक्षणिक संस्थांतील
भुस्सा मनातल्या मनात वजा करून
चेतनत्त्व प्रक्षेपित करू पाहणाऱ्या
शिक्षणमहर्षींना
आमरण पदसिद्धत्त्व पाहिजे असतं तेव्हा
त्यांच्या भूतकाळावर
चढू लागते आपोआपच
उच्च सांस्कृतिक मूल्यांची बुरशी
आणि कशालाही दिलं जातं अनायास
नैतिक अधिष्ठान.

१८.
चारित्र्यवान जबाबदार नागरिकाचं स्वप्न पडतं
महाविद्यालयातल्या बाकाला
ढळढळीत दिवसा

आणि निखळतं मधेच
कोसळतं अचानक् त्याच्यावर
फळ्याचं कुळकुळीत डांबर
संदर्भहीन ज्ञानाचं लिप्यंकन करणाऱ्या खडूची
रांगोळी होऊन उडते वाऱ्यावर

खिडकीखिडकीतून तरंगत येतात
उन्मादक गाण्यांचे विस्कळित तुकडे
तेव्हा भिंतींवर अवघडलेल्या मिथुनरेषांतून
सळसळतं चैतन्य
मादक पदार्थांनी झिंगून जातं
छत आणि बाकं
महाविद्यालयाचा होतो फिरता रंगमंच
चालतात त्याच्यावर
हिंदी सिनेमांच्या आणि
पारम्पारिक राजकारणाच्या रंगीन तालमी

—मी जातो बुडून
फाटक्या बुटांच्या ढिगाऱ्यात सबंध डोक्यापर्यंत
हातातून उकळतं फ्रीजिंग तापमान
पायांचा पत्ता नसतो
डोळ्यांत पडतात फटी बाहुल्यांऐवजी
पाठीच्या कण्याचं पीठ होऊन जातं
मेंदूत वाळवीची चाळवाचाळव
वाळलेल्या रक्ताचे थेंब पसरलेले
आसपास जागोजाग
कोपऱ्याकोपऱ्यातून भटकत फिरतात
दबलेले आवाज
एक भीतिचित्र उमळतं फॅन्टसीवर
आयुष्य मूल्यांनी मोहोरबंद करून
फेकून द्यावं लागतं कचऱ्याच्या ढिगाऱ्यात.

१९.
अल्लादीनच्या दिव्यातल्या राक्षसासारखा निमिषात

समोर आणून ठेवलेला मायावी भूतकाळ
मनातल्या खोल पाषाणप्रतिमा आणि वळणा—

वळणावर उभारलेले यातनांचे दगड/कोसळणारं
नशीब वळणावळणावर/संथ लयीनं अंग हिन्कळताना
सरोदच्या समेवर आदळलेला अल्लारखाँचा आघात

अंगाईपासून अस्ताईपर्यंत प्रत्येकीच्या अंतरात दडून
बसलेली निर्दयी हिंस्त्रता/बाहेर न येणारी/
देव्हाऱ्यात जळणाऱ्या परंपरागत समयांच्या संस्कृतीत

तेल नसतं त्यांचं/त्यांच्या नसतात वाती की नसतो
प्रकाश त्यांच्यासाठी/फक्त निमूट तेवत राहणं
फक्त आतल्याआत धुमसत जाणारी बंद सम्प्रेषणं

गळालाच कळणारं जाळीतल्या अतूट धाग्यांचं नातं
आणि यातना गिळून तडफडत राहणारे निरागस मासे
प्रत्येक प्रमेयातून स्वताच स्वताला शोधीत जाणं

सम चुकली तरी चुकत नाही कधीच दैवाचा आघात
गर्द भूतकाळ गर्द आठवणी गर्द एकेका
जटिल प्रमेयातला गुन्ता आयुष्यात.

२०.

कार्यकारणांचे पहारे चुकवून समोर येऊन ठाकलेलं
मोहमयी निमित्त ऐन बहरात अंगभर काटे फैलावून
डोळ्यात उभारलेलं शाल्मलीचं झाड त्याची
भडक फुलं गालांवर पहाडी नाकावर ताठा
ओठांवर पांगारा वक्षावरच्या वळचणीत
आसऱ्याला आलेली दोन फुलपाखरं केसात
बेर्निनीच्या प्रमत्त शिल्पातल्या काळ्या मरवराची
विलक्षण लय स्फटिकांचं सुरचित झाड गात्रांत
आणि माझी खिन्न निगेटिव्ह
स्वच्छ धुवून टाकणारं रसायन डोळ्यांत

—एका हातात काळ गोठवून गच्च धरून
ठेवलाय मी आणि दुसऱ्या हातानं वेचतोय

निखळलेल्या काचेचे तुकडे आरपार ज्यातून बघताना
प्रत्येक वेळी दिसायचे नवेनवे रूपबंध
भयाचे विस्मयाचे अज्ञात भावनांचे
जगण्यातल्या नव्हाळीनं मुसमुसून गेलेल्या
अव्यक्त आशयाचे

निमिषभर निमित्त फैलावत जातं सबंध आयुष्यभर
अधूनमधून फाटतं समतल वास्तव आणि
गाभ्यातली खन्त येते वर वेगानं उसळून
मनातल्या पाताळात उतरून
कोपरे धुंडाळत राहण्याचं काळोख हलवण्याचं
देहातीत सम्प्रेषणाचं
भरगच्च अपयश झाकलं जातं
दोन्ही ध्रुवांवर साचत जाणाऱ्या समजूतदार बर्फानं.

२१.

जगण्यातल्या असंख्य पातळ्यांमधली एक पातळी
होते निराकार कालान्तरानं  होते निस्संग निबोल निरूप
पहिलेवहिले रंग उडून जातात
आणि शरीर होतं विद्राव्य वास्तवात

तरीही माझं सृजन करतं अरूपाला आरूपित
अतींद्रियांना इंद्रियस्थ
आणतं उलगडून अक्षरांतून अचेतनाची संचेतना
माझ्या ओळी अव्यक्ताचे असंख्य चक्राकार जिने उतरून
खाली येतात जमिनीवर
आणि आदिम एकटेपणाची सम सांभाळत
घुसतात रस्त्यावरल्या गर्दीत

आणि माझ्या रस्त्यांवर अधूनमधून तरंगत येणाऱ्या
माझ्या कवितेतल्या रिकाम्या अवकाशाचा
वेध घेणाऱ्या अशरीर डोळ्यांना
लपवता येत नाही एकाकी क्षणातला
अधिकच गहिरा होणारा सुन्न रितेपणा

मी जगत गेलो प्रत्येक क्षण तीव्रतर आवेगानं
कुठल्याही आत्मसंरक्षणाशिवाय
कुठल्याही कवचकुंडलाशिवाय
जाणिवांचं जंगल ओलांडून येणारं
चुकार पाखरू माझं नव्हतं
एकटेपणाखाली अर्धमेलं होणारं
अनौरस सम्प्रेषण माझं नव्हतं
उगम हरवलेल्या पाण्याजवळ थबकणारे
उद्दाम घोडे माझे नव्हते

माझी होती फक्त समंजस भुई
आणि तिच्या गर्भातल्या लाव्हारसात
नामशेष झालेलं एक उध्वस्त महानगर.

२२.
सगळं बाळपण उंबरठ्याबाहेर ठेवून
आई आत आली
एकत्र कुटुंबातल्या कोंडवाड्यात तेव्हा
तिचं पूर्वायुष्य जळून गेलंव्तं होमकुंडात आणि
सप्तपदी ओलांडून दूर झालीव्ती माहेरची जमीन

आपापल्या पानाफुलांकडं पाहून वाढत जाणाऱ्या
कोंडवाड्यातल्या झाडांमुळं
झाकून गेला तिचा प्रकाश आणि
डोळ्यांवरही झापडं लावून तिनं
रात्रंदिवस ओढला घरकामाचा घाणा
मेंदी उडालेल्या हातांनी थापल्या भाकरीन् गोवऱ्या

सोळाव्वा श्रावण उलटून गेल्यावर एकदाच
विलग झालेव्ते तिचे ओठ पहिल्याच स्वप्नानं
आणि नंतर ठराविक अंतरानं तेच-तेच स्वप्न
आठही वेळा पडत गेलं तिला त्यातलंच एक
निखळून पडलं संपूर्ण फुलून यायच्या आतच
सात भूछत्रकं तरारून वाढलेली उर्वर जमिनीवर
परपोषी आयुष्य विस्कळित झाल्यावर

ऐन बहरात माना टाकणारी
पीता आलं नाही त्यांनाही कधीच
तिच्या यातनांचं डोळ्यांतून सांडणारं दव निरन्तर

मी केला विद्रोह पुकारलं बंड कोंडवाड्याविरुद्ध
तिच्यासाठी
तेव्हा तिनं थंड नजरेनं
माझ्याकडं पाहून पाठ वळवली
आणि बाकीच्या छत्रकांचे आघात अंगावर घेत
पहिल्यासारखंच चालू ठेवलं जगण्याचं युद्ध

—तेव्हा जाणवलं सगळं आयुष्य भयंकर असंबद्ध!

२३.
दैनंदिनीच्या सूक्ष्मदर्शक भिंगातून आरपार बघताना
ओळीओळीत आणि आकड्यांत गोठलेला असह्य भूतकाळ:
बाप झिजून झिजून गेला तरी काहीच झालं नाही

आयुष्यात त्याला मिळालं नाही कसलंच समाधान
मेंदूतल्या रसायनात सुकून गेलेली आशानिराशा
वाढत नव्हतं कुठलंच पानन् कळी काळोखात

गोष्टींसाठी अडून बसलेल्या निरागस पोराला
हज्जारो मैल एकट्यानंच प्रवास करीत अंडी घालून
परत येणाऱ्या रॉबिन पक्ष्याची गोष्ट सांगितल्यावर

डोळ्यांत पाणी आणून त्यानं सांगितलं की बाबा
उद्या गावाला जाऊ नका आणि लख्कन् तरळलं
काही तरी—फाटकी वहाण घालून शेतावर जाणाऱ्या

बापाच्या डोळ्यांत पाह्यलं आठवून तर बाप
चाललेला विचार करीत की कित्येक ऋतू
उलटून गेले तरी पाखरं परतत नाहीत घरट्याकडं

मुलं नातवा सुना माहेरी गेलेल्या पोरीबाळींना
आयुष्याचं जडशील ओझं उचलता उचलता
आठवणी ताणता येतील तितक्या ताणता येतात

पण तोडता येत नाहीत की सोडता येत नाहीत
आणि बाप बघतो शिवेवरल्या लिंबाऱ्यातून
नदीचं कोरडं ठणठणीत पात्र आणि काठावरची चिंच

वाऱ्यावर उडालेलं आयुष्य विस्कळित नात्यांचा गुंतावळा
सांगायला म्हणून वहरलेल्या पण पै-पैशानं करपलेल्या
आतल्याआत झिरपून आटून गेलेल्या मानवी भावना.

२४.

ब्रम्हांडाएवढं विस्तारत विस्तारत अचानक् एक चाक
भयंकर वेगानं गेलं निघून छातीवरून अनंतात
आणि रक्ताचं एक नातं निखळून पडलं
झालं विलीन अवेळीच अभाववाचक सर्वनामात

आपल्याच आयुष्याचा लचका तोडून सरणावर ठेवल्यावर
ज्वाळांचं भयंकर तांडव भडकलं माझ्या अंतरात
जाळून टाकलं त्यानं निमिषात आंतरिक विश्व
आत विस्तारत गेली शून्यभयाण पोकळी

रात्र भडकायला आल्यावर भानावर येऊन
मी घेतलं पाणी सर्द विहिरीतलं अंगावर
वीसेक वर्षांच्या आठवणींची लक्तरं
स्मशानातल्या चिंचेवर वाळत घालून
परतलो घराकडं
पाह्यलं एकदाच अनावर होऊन मागं वळून
रंभागर्भातलं आकाश निघालेलं आदिम अवकाशाकडं

मरणानं टाकले बदलून तमाम आंतरिक संदर्भ
टाकल्या उकलून फटाफट् नात्यातल्या निरगाठी
तोडले तंतू आप्तेष्टांचे विशाल समूहातले
उरलेल्या धाग्यांनी अधिकच आवळलं करकचून आयुष्य
भूत-भविष्याची विलक्षण ढवळाढवळ करून
आयुष्य झालं कंटाळवाण्या वर्तमानातलं
कर्ताकर्म हरवून बसलेलं अर्थहीन निष्क्रियापद.

२५.
हिवाळ्यातली सघन शान्तता
पानगळणीसारखं बर्फच बर्फ
पानांचं उदास नसतेपण
झाडांचे सांगाडे आठवणींसारखे
सांगाड्यांवरील जिवट नव्या पानांचा
लडिवाळपणा पुन्हा नव्या मौसमात
घराघरांतून वाढत जाणारी छायासक्त झाडं
स्वप्नातून आलेली
उन्हाळ्यातली भडकरंगी फुलं
पानाफुलांचे सुशीतल चकाकते रंग
संध्याकाळच्या विरळ हवेतले अनोळखी तरंग
वर तरंगत आलेले
कृष्णसंगितातले करवती तुकडे
शरद ऋतूचे बदलते आकार
काळ गोठून सांडलेला अवकाश होऊन
दऱ्या खच्चून भरलेल्या नवागत पात्यांनी
हौशी झुडुपांनी
उडत-बागडत निघालेल्या फुलरंगी थव्यांनी

—आणि
हरवलेल्या पूर्वायुष्याची
घट्ट वीण उसवीत सातासमुद्रापलिकडं
एक पाखरू भिरभिरू लागतं दुपारच्या पोकळीत
तेव्हा त्याला आणतं अलगद जमिनीवर
मखमली गर्भाशयात वाढत जाणारं
पहिल्याच सृजनातलं अगम्य अद्वैत

मरण आणि सृजनाच्या
सातत्यसाखळीतले दुवे
घट्ट गुंतून बसतात
परस्परांच्या अंगभूत रितेपणात.

२६.

इस्पितळातल्या प्रकाशाचं भयंकर वजन छातीवर
आणि कोपऱ्यातल्या काळोखातला सगळा आदि-एकान्त
ग्लानी आणि धक्के
गात्रातून उकळत जाणारा लाव्हा
प्रत्येक वेदना किती तीव्रनिखळ निश्चळ
गूढ आणि स्थितिस्थापक
वेळेतून काळातून स्थळातून जाणिवांतून
आणि तमाम इंद्रियस्थ आयामांतून
पुन्हा वर आलेली उसळून
मासा गिळणाऱ्या ओहोटीच्या लाटेसारखी
प्रत्येक वेदना किती सर्वंकश आणि सर्वहीन
स्वनियत आणि स्वयम्गुणित
अनायास सृजनाच्या गळाला लागणारी
फक्त असतेपण हुंगीत जाणारी

भराभर उकलत जातो महासमुद्र डोळ्यांसमोर
जारणतारणाच्या डोलकाठ्या हेलकावतात एकटेपणात
सगळं सगळेपण किती परस्वी वाटतं

इस्पितळातलं आयुष्य पुसून टाकतं पाटी
तिच्यावर उमटत जातात पुन्हा पहिल्यापास्नं
आचारविचारांची आद्याक्षरं
आणि नात्यागोत्याची विरामचिन्हं
इस्पितळ होतं तात्पुरता थांबा मूल्यांकनासाठी
आणि आजार ज्ञानतंतू
मरणाच्या स्पर्शानं झटकन् मागं सरकणारा.

२७.

मी मरणाला सामोरं जाताना
किती उत्साहित झालोवृतो
त्यालोवृतो माझा निखळ वेदनालंकार
चराचर विझत चाललवतं डोळ्यांतल्या डोळ्यांत

आणि अरूपाचा उत्सव होता
इंद्रियातील किनाऱ्यावर

आणि किनाऱ्यानं हुलकावणी दिल्यावर
मरणमयी वाळू निसटली हातातून
संचित उजळलं होमात वास्तवाच्या विस्तवानं
आतून निनादू लागलं गंभीर सत्-सूक्त :

'सत्' एक धातू आहे
न गंजणारा
असंख्य त्याची धातुसाधितं सभोवताल
अन्तरिम सत्त्यात सत्तेत आसक्तीत
गुत्त्यात आणि पत्त्यांतल्या सत्त्यात...

माझ्या अनादिमानसात दडून बसलेल्या
सदसत्विवेका
माझं सृजन नाकारतय् सगळी धातुसाधितं
आणि
मी तुला आवाहन करतोय
की ये ऽ
आणि माझ्या सांगाती अस
की मी चाललोय्—

सम्भवातून भवाकडे
सम्भ्रमातून भ्रमाकडे
सम्वेदनेतून वेदनेकडे.

२८.
मी सजवला माझा महाप्राण अभावाच्या
आभुषणांनी
अभावाची आकर्षक वस्त्रं चढवली त्याच्यावर
दिली असंख्य निश्वासनं
आणि नसतेपणाच्या एका ऋतूत
केला गृहप्रवेश शून्याचा उंबरठा होऊन

जगलो उत्कट नेणिवेचं आयुष्य
आकंठ जेवलो न्यून्न्यान्न
इंद्रियं सजवली पोकळ अनलंकारांनी
झोपलो नकारशय्येवर
ऐकलं सुनसान् नि:स्वन संगीत
चितारले नकारांचे नानाविध आकार
खेळलो छप्पापाणी
नाहीनाहीच्या दाही दिशा धुंडाळत
गर्गरत गेलो अ पासून न पर्यंत
माझ्या तमन्ना नन्नानन्ना
नास्ती नास्ती माझी मस्ती
आणि मस्तीनं नासून गेल्यावर
नस्त्या वेदना उमलून आल्या माझ्या नास्तित्त्वावर
मी हरवलो माझ्यातून
हरलो
आणि शरण गेलो माझ्या नास्तीश्वराला
केली प्रार्थना
की हे नास्तीश्वरा
माझ्या अन्तरातल्या पोकळीत
खुपसव तुझं निरंकुश
आणि मला उणं करून टाक
शून्याच्या नेणूरेणूतून.

■ ■ ■

सहावी कविता
निवांत
१९८०

आज मी सांगणारय् साठा समस्यांची कहाणी
निष्फळ अपरिपूर्ण
जसं इतरांच्या कोषात शिरून आपलंच आत्मशोधन

आज मला आठवतय्
इथल्या अक्षांशावर सुरू होणारं तुझं आयुष्य
ओळीनं उडालेली चौदा वर्षं
भटकंतीनं सपाट झालेली पावलं
आणि मनाभोवती गरगरत गेलेली
माणसामाणसांतली सघन गुंतागुंत
चिरंतन निराशा चिरंतन अस्वस्थता
सार्वत्रिक पडझडीतली चिरंतन नैतिक खंत

आज मला आठवतोय्
मी घरी परतलो तेव्हाचा

अंधारात भिंतीला टेकून बसलेला
आणि तासन्तास धुरात निःशब्द होत जाणारा
चिंताक्रांत चेहरा तुझा
आणि मनातली खिंडारं धुंडाळून वर येणारा
शून्यात विस्तारत जाणारा कवितेचा तुकडा
गुरुत्वाकर्षातून निसटणारी अस्वस्थता
नकाशाशी जोडणाऱ्या पाचदहा ओळी
सकाळसंध्याकाळी

नंतरच्या घटिका लांबत लांबत वर्षांत विसावल्या
जमिनीवर उभं राहून पृथ्वीची गती जाणवत नाही
तसंच काळाचंही जगण्याच्या प्रवाहात
नंतरचे ऋतू पालटले भराभर
पानं
उमलतवाढतविस्तारतसुकतगळत गेली आपोआप
अडकत गेली पुन्हा नव्या चक्रात
तूही आस्तेआस्ते कातटाकून उभा राहिलास
इथल्या स्थळाची सगळी परिमाणं
उतरत गेली तुझ्या देहातल्या भट्टीत
आणि जळून एकंकार झाली रक्तातल्या रक्तात
एक आंतरिक दुरावा होता
तेवढाच आधीचा पुरावा होता तोही सुटत गेला हळूहळू
आतल्याआत भक्कम कडेकोट उभारून
सरकीवरील धाग्यांसारख्या विस्तारत गेलास
बाहेर अवकाशात

व्यक्ती आणि समष्टीच्या
आदिद्वंद्वातून भरडून निघताना
मीही स्वीकारलं जगण्याचं संदर्भसूत्र
विक्षिप्त छताखालची बंधनं झुगारली
मनाचं पाणी करून आकार अनुभवले
आदिम एकटेपणावर मुलामे चढवले
दुःखाचा अनादिबंध वास्तव म्हणून स्वीकारला

स्वत:चे स्वत:शी लढे झाले काही
शब्दांची शरीरं फाडून
आत अनुभवाचा भुस्सा भरून ठेवला
सृजन झालं आत्म्यावर
तरारून आलेली अनियंत्रित गाठ

कसल्या बेहोषीत नैतिक कणे कायम ठेवले
अंगावर उलटणारे दंभांचे फणे चिरडून काढले
जातीधर्माच्या मातीवर मिरवणाऱ्या
विषाक्त वेली कापत सुटलो अरण्यात
दलदल हटवण्याचा एकाकी हटयोग
गढूळ व्यवस्थेतल्या लांडग्यांशी विद्रोह
पावलापावलागणिक युद्धाचा प्रसंग अनुभवला निस्संग
चढत जाणाऱ्या सिम्फनीतली सगळी वाद्यं
अचानक थांबावीत तसं थांबून मधेच
मी पाहत्यलावता माझा कायापालट
चेतनपातळ्यांवरून फिरून आल्यावर
हतबल होणं असायचंच अधूनमधून
तरीही मुठी आवळल्या घट्ट
आणि पायांवर नक्षत्र कोरलं
एका अदृश्य तराजूच्या काट्यावर
नजर खिळवून भटकलो गर्दीत
दांभिकांचे मुखवटे फाडले
जिभेवर अनायासे निवडुंग वाढले
अंगावर माजणारी लव्हाळी छाटली
सगळीकडूनच भुई फाटली तरीही थांबलो नाही
कळपातलं कळसूत्री भावलं झालो नाही.

आता छत्तीस पहाड ओलांडून झाल्यावर
सर्द होऊ लागली आहे सुरुंगातली दारू
कळत-नकळत झडतायत् निवडुंग
आतल्याआत आदर्शाचं धुकं पसरत चाललय्
आणि पुन्हा एकदा थाम्बलोय् मी

REFBK-0023539
REFBK-0023539

सम्भ्रमित होऊन एका चौरस्त्यावर

आता मला व्हायचं आहे निवांत निर्विकार
यातना गिळून दडवायच्या नाहीत
जपायची नाहीत दु:खं पाताळातली
आतल्याआत संरक्षक कडेकोट उभारून
ठेवायचं नाही कुणालाच अवघडून
आत्मकेंद्रितेवर उपाय म्हणून
सामाजिक जाळं विणायचं नाहीय्
आणि गाभ्यातल्या निर्दयतेला भिऊन
निर्भयाचं गाणं गुणगुणायचं नाहीय्
मनावरचे ओरखाडे निघून जातील
अशी रीत मला दाखव
दु:खाची पाळंमुळं उपटून फेण्याचा
धर्म मला शिकव
आयुष्यभर जमवलेल्या अन्यथाज्ञानाचं
ओझं उतरव
स्वत:तून समष्टीत विरघळून जाण्याचा
मार्ग मला दाखव
अचेतनातलं नातं उमलव
करुणेचे रेणू माझ्या हृदयात भिनव

एरवी एक प्रेषित
माझ्याही मेंदूत अवघडून बसलाय
त्याच्या तालावर नाचून आयुष्य विस्कटून जाईल.

■ ■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७५२
२३५३९
नाव २५।५।८२
ठाणे (स्थळ प्रत)